## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :

माझे नाव : मनोहर तावजी केंगले
माझे वाय : ३३ वर्षे,
व्यवसाय : जवान, राज्य उत्पादन शुल्क
राहणार : मंचर , ता. आंबेगाव, जि. पुणे

## सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. वाय. जे. चन्ने यांच्या मार्फत.

१. जून २०१८ ते आजपर्यंत मी राज्य उत्पादन शुल्क, नारायणगाव विभाग येथे कार्यरत आहे. घटना दिनांक २२.१२.२०१८ रोजी घडली होती. मी आणि माझे वरिष्ठ अधिकारी दुय्यम निरीक्षक श्री. हांडे साहेब कार्यालयात हजर असताना हांडे साहेबांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की लोणी गावच्या हददीत हॉटेल राजेशाहीच्या पाठीमागे एका पत्र्याच्या शेडमध्ये अवैधरित्या दारूची विक्री होत आहे. त्यानंतर आमच्या साहेबांनी मला दोन पंच आणण्यास सांगितले. त्यानुसार मी दोन पंच नामे अनिकेत बोत्रे व दत्तात्रय कु—हाडे या लोकांना आमच्या कार्यालयात घेवून आलो. त्यानंतर आमच्या साहेबांनी दोन्ही पंचांना बातमीचा आशय समजावून सांगितला. त्यानंतर आवश्यक साहित्य घेवून मी, हांडे साहेब व दोन पंच असे सगळे मिळून बातमीच्या ठिकाणी गेलो. बातमीच्या ठिकाणाच्या अलिकडेच आड बाजूला आम्ही आमचे खासगी वाहन थांबविले व तेथून आम्ही सर्वजण चालत जावून हॉटेल राजेशाहीच्या पाठीमागे एका पत्र्याच्या शेडमध्ये गेलो. त्यावेळेस आम्हांला पत्र्याच्या शेडमध्ये एक इसम बसलेला दिसला व आम्हांला बघून तो उभा राहिला. साहेबांनी त्यांचा स्वत:चा आणि आमचा परिचय त्या इसमाला करून दिला आणि तेथे येण्याचा उददेश सांगितला. त्यानंतर आमच्या साहेबांनी त्या इसमास आमच्या झडत्या घेण्याचे सांगितले असता त्या इसमाने झडती घेण्यास नाकारले. त्यानंतर आमचे साहेबांनी त्या इसमाचे नाव व पत्ता विचारले असता त्या इसमाने स्वतचे नाव मिनीनाथ दत्तात्रय पावशे, वय २८ वर्ष, राहणार लोणी असे सांगितले. त्यानंतर मी आणि आमच्या साहेबांनी पत्र्याच्या शेडमध्ये कसून शोध घेतला असता आम्हांला एका कोप—यामध्ये तीन पुठयांचे बॉक्स मिळून आले. त्यानंतर पंचासमक्ष आमचे साहेबांनी पुठयांची पाहणी केली असता त्यामध्ये विदेशी मदयाचा साठा

आढळून आला. एका पुठयाच्या बॉक्समध्ये १८० मिलीच्या ओसी कंपनीच्या १५ बॉटल मिळून आल्या. दुस—या पुठयांच्या बॉक्समध्ये १८० मिलीच्या मॅकडॉनल नंबर वन च्या ३ बॉटल मिळून आल्या व तिस—या पुठयाच्या बॉक्समध्ये १८० मिलीच्या मॅकडॉनल कंपनीच्या २ सीलबंद बॉटल व एक सील फुटलेली बॉटल ज्यामध्ये २० मिली मदय होते, एवढा माल मिळून आला. सदर माल हा २६५० रूपयाचा होता. त्यानंतर मिनीनाथ पावशेला आमच्या साहेबांनी दारू विक्रीचा परवाना आहे का याबाबत विचारले असता त्याने दारू विक्रीचा परवाना असल्याचे नाकारले. त्यानंतर आमच्या साहेबांच्या सांगण्यानुसार जप्त मुददेमालामधून एक ओसी कंपनीची सीलबंद बॉटल वेगळी काढून आमच्या साहेबांच्या, पंचाच्या व आरोपीच्या सहीचे लेबल लावून शासकीय लाखेने सील केले. पंचासमक्ष मिनीनाथ पावशे याला अटक केली. सॅम्पल साठी काढलेली बॉटल आपल्या ताब्यात घेतली. आमच्या साहेबांनी आरोपीची पंचासमक्ष अंगझडती घेण्यास सांगितले. आरोपीची अंगझडती घेतली असता आरोपीच्या अंगझडतीतून कोणतीही मौल्यवान चीज वस्तू सापडली नाही. जागेवर मुददेमाल मिळून आल्याचा पंचनामा साहेबांनी पंचासमक्ष केला. त्यानंतर मी आरोपीविरूध्द फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र. १५** देण्यात येते. आरोपीला बघितले तर मी ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहे.

## उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एम. के. वळसेपाटील यांचे मार्फत

**२.** दिनांक २२.१२.२०१८ रोजी मी माझे कार्यालयात सकाळी ९. ३० वाजता गेलो होतो. पंचांना मी लेखी नोटिस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की पंच अनिकेत बोत्रे व दत्तात्रय कु—हाडे यांची पंच म्हणून अनेक केसमध्ये नाव आहे. अनिकेत बोत्रे व दत्तात्रय कु—हाडे हे नारायणगाव येथे आमच्या कार्यालयाच्याजवळ राहतात. नारायणगावपासून लोणी किती किलोमीटर अंतरावर आहे हे मला सांगता येणार नाही. ज्या खासगी वाहनाने आम्ही घटनास्थळावर गेलो त्या खासगी वाहनाचा नोंदणीकृत क्रमांक मला सांगता येणार नाही. राजेशाही हॉटेल व त्या मागच्या टीनचा पत्रा कुणाच्या मालकीचा आहे हे मला सांगता येणार नाही. राजेशाही हॉटेलचा व त्याच्या मागच्या टीनचा पत्र्याच्या सर्वे नंबर व मिळकत क्रमांक मला सांगता येणार नाही. हॉटेलच्या आसपास व इतर

ठिकाणी मी लोकांकडे चौकशी केली नव्हती. आरोपीकडून जप्त केलेल्या मुददेमालाच्या प्रत्येक बॉटलचे बॅच नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे फिर्यादमध्ये मी वेळ नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीकडून जप्त केलेला मुददेमाल आज न्यायालयासमक्ष हजर नाही. हे म्हणणे खरे नाही की आम्ही राजेशाही हॉटेलच्या मागे असलेल्या टीनच्या शेडमध्ये जावून आरोपीच्या ताब्यातून विदेशी मदयसाठा जप्त केल्याची अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जागेवर गेलो व पंचनामा केला हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की केवळ शासकीय कोटा पूर्ण करण्यासाठी मी आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की चुकीच्या माहितीच्या आधारे मी खोटी फिर्याद दिली व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : २१/१२/२०१९ (एन. डी. मेश्राम)
घोडेगाव न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग